**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ४१४/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
सौ.वसुधाताई महेंद्र गाढवे,
व्दारा, वसुंधरा साडी सेंटर,
मु.पो.कारंजा लाड, ता.कारंजा, जि.वाशिम.
**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, अकोला.
२. जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक,
श्री.भायजी महाराज माध्यमिक,
उच्च माध्यमिक विदयालय,
मु.धाकली, पो.ता.कारंजा, जि.वाशिम.

**(आदेश पारीत दिनांक २२/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी तर्फे श्री.महेंद्र लिलाधर गाढवे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे उपशिक्षणाधिकारी, माध्यमिक, जि.प. अकोला श्री.एस.एच. वाकोडे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री.भायजी महाराज, माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालय धाकली श्री.पी.जी. तिकोडे हे हजर आहेत.

अर्जदार यांनी माहिती अधिकारी यांचेकडे दिनांक ३०/१०/०९ रोजी माहिती मागितलेली आहे. ती न मिळाल्यामुळे प्रपत्र 'ब' नुसार दिनांक १२/०१/२०१० ला शिक्षणाधिकारी, माध्य. जिल्हा परिषद, अकोला यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांना जन माहिती अधिकारी यांनी असे लिहुन दिले होते की, ते माहिती देण्यासाठी तयार आहेत त्यामुळे तसा आदेश पारित करण्यात आला होता. त्यानुसार शिक्षणाधिकारी यांनी सुनावणी घेवुन माहिती पुरविण्याबाबत आदेश देवुन सुध्दा माहिती मिळाली नाही म्हणुन अर्जदाराला व्दितीय अपिल या आयोगासमोर दाखल करावे लागले. सदर प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी ही बाब मान्य केली की, अर्जदाराला माहिती पुरविण्यात येईल. तरी सदर माहिती ७ दिवसात पंजीबध्द डाकेने अर्जदाराला पुरविण्यात येईल. तसेच अर्जदाराला झालेल्या शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रासाबाबत रु. २०००/- नुकसान भरपाई म्हणुन आदेश मिळाल्यापासुन ६ आठवडयाच्या आंत रोख किंवा डिमांड ड्राफ्टव्दारे संबंधित प्राधिकरणाने अर्जदारास अदा करावे व सदर रक्कम कोणाकडुन वसुल करायची याबाबत संस्थेचे अध्यक्ष यांनी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा. अर्जदाराला त्यानंतर माहिती न मिळाल्यास कलम १८ खाली हया आयोगाकडे तक्रार करु शकतात.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.४१६ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. योगेश माणिकराव देशमुख,
मु.पो.टाकरखेडा (शंभु), ता.भातकुली,
जि.अमरावती.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, अमरावती.
२. जन माहिती अधिकारी
तथा उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग,
अमरावती, ता.जि. अमरावती.

**(आदेश पारीत दिनांक २२/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे कार्यकारी अभियंता, बांधकाम, जिल्हा परिषद, अमरावती श्री.एस.ए. राऊत हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अमरावती श्री.बी.पी. उमाळे हे हजर आहेत.

अर्जदाराने व्दितीय अपिल दिनांक ११/०३/२०१० रोजी हया आयोगासमोर दाखल केले व त्यात अपुर्ण माहिती मिळाल्याबाबत तक्रार केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार दिनांक ०९/११/२००९ ला माहिती पुरविल्यानंतर अर्जदाराचे समाधान न झाल्याने प्रथम अपिलात दिनांक ०३/११/०९ ला प्रथम अपिलात निर्णय देवुन अर्जदाराला माहिती देण्याचा आदेश देण्यात आला व त्यानंतर दिनांक १८/१२/२०१० रोजी पंजीबध्द डाकेने अर्जदाराला माहिती पुरविण्यात आली. अर्जदाराला माहिती मिळाल्यामुळे अर्जदार गैरहजर राहिले असावे, असा निष्कर्ष काढण्यात येवुन अर्जदाराचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.४१७/ २०१०**
**अपिल क्र.४१८/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. रामदास भानुदास उर्फ बाबाराव पाटील पाचडे,
रा.ंलंघापुर, पो.पोही, ता.मुर्तीजापुर, जि.अकोला.
**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मुर्तीजापुर,
ता.मुर्तीजापुर, जि.अकोला.
२. जन माहिती अधिकारी तथा
शाखा अभियंता, पंचायत समिती, मुर्तीजापुर,
ता.मुर्तीजापुर, जि.अकोला.
३.जन माहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी, पंचायत समिती, मुर्तीजापुर,
ता.मुर्तीजापुर, जि.अकोला.

**(आदेश पारीत दिनांक २२/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. रामदास भानुदास उर्फ बाबाराव पाटील पाचडे हे हजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मुर्तीजापुर श्री.विनोद खेडकर हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा शाखा अभियंता, पंचायत समिती, मुर्तीजापुर श्री.पी.आर. रनबावरे हे हजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, मुर्तीजापुर श्री.जी.बी. देशमुख हे हजर आहेत.

अपिल क्रमांक ४१७/२०१० व ४१८/२०१० या दोन्ही प्रकरणात अपिल क्रमांक ४१७/२०१० मध्ये प्रपत्र ‘अ’ नुसार दिनांक २३/११/२००९ रोजी बांधकाम विभाग, पंचायत समिती, मुर्तीजापुर यांचेकडे ४ मुद्दयात माहिती मागितली. त्यामधील ३ मुद्दयाची माहिती मिळाल्याचे अर्जदाराने कबुल केले. मुद्दा क्रमांक ४ बद्दलची माहिती ही मिळाली नाही ती खालीलप्रमाणे आहे.

मु.क्र.४. श्री.रणबावरे यांनी दलीत वस्ती, सं.ग्रा.रो.यो. यशवंत ग्रामसमृध्दी योजना, डि.आर.डी.ए. कडुन प्राप्त निधीतील कामे, १२ वा वित्त आयोग ग्रामपंचायत स्तर आणि पं.स. स्तर या योजनेअंतर्गत मोजमाप पुस्तीकेमध्ये झालेल्या कामांच्या ज्या नोंदी घेतलेल्या आहेत त्यांची तारीख निहाय माहिती तसेच मुल्यांकन केल्याची तारीख निहाय माहिती मागितली. सदरची माहिती ही दिनांक २२/११/२००९ मधील मागितली.

तसेच अपिल क्रमांक ४१८/२०१० मध्ये सुध्दा प्रपत्र ‘अ’ दिनांक २३/११/०९ ला दाखल केले व त्यात ७ मुद्दयांची माहिती मागण्यात आली व त्यात दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत केलेल्या पाणीपुरवठा कामाचे हातपंप आणि पीव्हीसी पाईप लाईन याबाबत माहिती मागितली. सदरची माहिती दोन्ही अपिलात न मिळाल्यामुळे अर्जदाराने व्दितीय अपिल क्रमांक ४१७ मध्ये दिनांक १८/०१/२०१० रोजी व अपिल क्रमांक ४१८ मध्ये दिनांक २१/१२/२००९ रोजी प्रथम अपिल दाखल केले व दोन्ही अपिलात जन माहिती अधिकारी तथा

शाखा अभियंता श्री.रनबावरे यांना अर्जदाराला १० मार्च पर्यंत माहिती पुरविण्याबाबत आदेशीत केले होते. सदरची माहिती ग्रामपंचायत सचिव, श्री. एस.एन. इंगळे यांचेकडुन उपलब्ध करुन घ्यावी. तसेच अपिल क्रमांक ४१८/२०१० मधिल माहिती फक्त लंघापुर ग्रामपंचायत संबंधी आहे व अपिल क्रमांक ४१७/२०१० मधील माहिती सर्व ग्रामपंचायत संबंधी आहे. तरी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशानुसार सदर दोन्ही प्रकरणात लंघापुर ग्रामपंचायत संबंधीची माहिती आजपासुन १० दिवसात देण्यात यावी. तसेच अपिल क्रमांक ४१७ मधील माहिती एकत्रित करण्यास वेळ लागणार असल्यामुळे सदरची माहिती संबंधित सचिव यांचेकडुन ४ आठवडयाच्या आंत पुरविण्यात यावी व जी माहिती त्यांचेकडुन उपलब्ध झाली नाही त्याबाबतची तक्रार गटविकास अधिकारी यांचेकडे करावी. तसेच वरील प्रकरणात अर्जदाराला झालेल्या शारीरिक, मानसिक व आर्थिक हानीबाबत प्रत्येक व्दितीय अपिलात रु. २०००/- (रु.दोन हजार फक्त) ६ आठवडयाच्या आंत अर्जदाराला अदा करावे. सदरची रक्कम सार्वजनिक प्राधिकरणाने म्हणजे पंचायत समितीने सोसायची की, संबंधित जबाबदार अधिका-याकडुन वसुल करायची याबाबत गटविकास अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा.

वरील आदेश देवुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.४२३ / २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. पवन अजाबराव मुंगले,
अण्णाभाऊ साठे चौक, पाटीपुरा,
यवतमाळ, ता.जि. यवतमाळ.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
जिल्हा परिषद, यवतमाळ.
२. जन माहिती अधिकारी तथा
सहाय्यक प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
जिल्हा परिषद, यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक २२/१२/२०१०)**
**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तर्फे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रकल्प अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, यवतमाळ श्री.पी.ए. देव हे हजर आहेत

अर्जदाराने हया आयोगाचे नांवाने दिनांक २१/१२/२०१० रोजी पत्र देवुन संपुर्ण माहिती दिनांक २१/१२/२०१० रोजी प्राप्त झाली आहे व अर्जदाराचे समाधान झाले आहे व दिनांक २०/०३/२०१० रोजी दाखल केलेले अपिल मागे घेत असल्याबाबत लिहुन दिले.

अर्जदार अपिल मागे घेत असल्यामुळे अर्जदाराचे अपिल खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र.४१५/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**

श्री. अशोक वासुदेवराव जयसिंगपुरे,
सरचिटणीस, महा.राज्य नर्सेस व आरोग्य कर्मचारी संघटना,
व्दारा पेशवे प्लॉट, ॲड. साबळे यांचे घरासमोर,
आरोग्य पतसंस्था, यवतमाळ, ता.जि. यवतमाळ.

**विरुध्द**

१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ.

२. जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी, कुटुंब कल्याण पथक,
यवतमाळ, जि.यवतमाळ.

**(आदेश पारीत दिनांक २२/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी हे गैरहजर आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी तर्फे कक्ष अधिकारी, जिल्हा परिषद आरोग्य विभाग, यवतमाळ श्री.वाय.एस. पाळेकर हे हजर आहेत.

अर्जदाराने दिनांक १८/१२/२०१० रोजी हया आयोगाच्या नावांने पत्र देवुन अर्जदाराला दिनांक १८/१२/२०१० ला माहिती पुरविण्यात आली व कुठलीही तक्रार राहीली नाही. अपिल खारीज करण्यात यावे असे लिहुन दिले आहे.

अर्जदाराची विनंती मान्य करण्यात येवुन अपिल खारीज करण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठ, अमरावती यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये प्राप्त अपिल**

**अपिल क्र. ४२०/ २०१०**
**जा.क्र.**
**दि.**

**अर्जदार तथा अपिलकर्ता**
श्री. अरुण ल.सोनोने,
विश्वशांती  नगर, पिंपळगांव रोड,
ग्रामपंचायत पिंपळगांव, प्लॉट क्र.२४,
ता.जि.यवतमाळ.

**विरुध्द**
१.प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गटविकासअधिकारी, पंचायत समिती, यवतमाळ
ता.जि.यवतमाळ.

२. जन माहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत, पिंपळगव्हाण,
ता.जि.यवतमाळ

**(आदेश पारीत दिनांक २२/१२/२०१०)**

**-निर्णय-**

अर्जदार तथा अपिलार्थी श्री. अरुण ल.सोनोने हे हजर आहेत.  प्रथम अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी, पंचायत समिती, यवतमाळ श्री.एस.डी.जुगनाके हे हजर आहेत.    जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत, पिंपळगांव, श्री.एस.एम. युवनाते हे हजर आहेत.

अर्जदाराने दि.०२/०९/२००९ रोजी मागितलेली माहिती मिळाली नाही असे अर्जदाराचे म्हणणे आहे.  जन माहिती अधिकारी यांचे म्हणण्यानुसार अर्जदाराला दिनांक ३०/०९/२००९ रोजी माहिती घेवुन जाण्यासाठी पत्र देण्यात आले. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार पत्र मिळाले परंतु अर्जदार माहिती घेण्यासाठी सचिव तथा विस्तार अधिकारी, पंचायत हे प्रशासक म्हणुन कार्यरत असतांना त्यांचेकडे ३ वेळेला गेले परंतु माहिती देण्यात आलेली नाही. त्यानंतर दिनांक १२/११/०९ ला गटविकास अधिकारी, पंचायत समिती,  यवतमाळ यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले.  सदर प्रकरणात गटविकास अधिकारी यांनी दिनांक ११/१२/२००९ व १९/१२/२००९ ला सुनावणी घेतली, त्यावेळेला सुध्दा अर्जदार हजर होते. दिनांक १९/१२/२००९ रोजी प्रथम अपिलाच्या सुनावणी दरम्यान श्री.पी.जी. पारवे जन माहिती अधिकारी तथा प्रशासक व अपिलाथी श्री.अरुण लक्ष्मणराव सोनोने हे हजर होते. अपिलार्थी यांना माहिती मिळाली की नाही याबाबत विचारणा केली असता माहिती मिळाली नाही असे अर्जदार यांनी सांगितले व त्यानुसार अर्जदाराने मागितलेली माहिती ८ दिवसाचे आंत विनाशुल्क अर्जदाराला पुरविण्यात यावी  व अहवाल या कार्यालयास सादर करावा असा आदेश जन माहिती अधिकारी तथा प्रशासन यांना देण्यात आला.  त्यानंतर दिनांक १९/१२/०९ रोजी सुनावणी झाली माहिती देण्यात येत आहे असे सांगितले.  माहिती पंचायत समितीकडुन ग्रामपंचायतला मागण्यात आली आहे. अद्यापपावेतो माहिती मिळाली नाही असे नोटींग संबंधित निकाल पत्रावर दिनांक २०/१२/०९ अर्जदाराने दिले आहे.    त्यानंतर अर्जदाराने दिनांक ०३/०२/२०१०रोजी गटविकास अधिकारी यांना अजुनपर्यंत अर्जदाराला माहिती मिळाली नाही याबाबत पत्र दिले.  हयावरुन ही बाब सिध्द होते की, जन माहिती

अधिकारी यांनी अर्जदाराला माहिती देण्यासाठी टाळाटाळ केलेली आहे तसेच व्दितीय अपिलाच्या सुनावणी पर्यंत अर्जदाराला माहिती पुरविण्यात आलेली नाही. सध्या कार्यरत असलेले सचिव श्री.एस.एम. युवनाते हे हजर आहेत व त्यांनी तत्कालीन प्रशासक तथा विस्तार अधिकारी, पंचायत दिनांक ०८/०९/२०१० च्या त्यांच्या नियुक्तीनंतर त्यांनी सदर ग्रामपंचायतचा पदभार स्विकारला होता. सदर प्रकरणात अर्जदाराला दयावयाच्या माहिती संबंधीची फाईल ही विस्तार अधिकारी यांचेकडे होती व काल या आयोगाकडे सुनावणीसाठी येण्याकरिता त्यांचेकडुन घेण्यात आली.

वरील बाबी लक्षात घेता ही बाब निश्चित आहे की, तत्कालीन प्रशासक तथा विस्तार अधिकारी, पंचायत यांचेकडे माहिती असतांना सुध्दा अर्जदाराला माहिती देण्यास टाळाटाळ केली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेशीत करुन सुध्दा त्यांचे आदेशाचे कुठल्याही प्रकारे पालन करण्याचा प्रयत्न केलेला नाही म्हणुन अर्जदाराचा अर्ज कलम ७(१) नुसार निकाली न काढणे, माहिती उशिरा देणे व माहिती देण्यास टाळाटाळ करणे याबाबत त्यांना दोषी ठरविण्यात येवुन त्यांना लागु असलेल्या सेवाविषयक नियमाचा भंग केल्याच्या कारणावरुन त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २०(२) प्रमाणे कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. तसेच अर्जदाराला झालेल्या शारीरिक, मानसिक व आर्थिक नुकसानीबाबत रु.२००० (रु. दोन हजार फक्त) रोख किंवा डिमान्ड ड्राफ्टव्दारे अदा करण्यात यावे व सदरची रक्कम सार्वजनिक प्राधिकरणाने अदा करुन ती रक्कम कोणाकडुन वसुल करायची याबाबत गटविकास अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर निर्णय घेण्यात यावा. तसेच अर्जदाराला मागितलेली माहिती या आयोगासमोर पुरविण्यात आली.

खालील आदेश पारीत करुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**आदेश**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांनी वर शिफारस केल्यानुसार विस्तार अधिकारी, पंचायत श्री.पारवे यांचे विरुध्द शिफारस केल्यानुसार शिस्तभंगाची कारवाई करुन ३ महिन्याच्या आंत या आयोगास अहवाल सादर करावा.
२. अर्जदाराला झालेल्या शारीरिक, मानसिक व आर्थिक नुकसानीबाबत सार्वजनिक प्राधिकरणाकडुन रु.२०००/- रोख किंवा डिमान्ड ड्राफ्टव्दारे गटविकास अधिकारी यांनी आदेश मिळाल्यापासुन ६ आठवडयाच्या आंत अदा करावे व सदरची रक्कम सार्वजनिक प्राधिकरणाने अदा करुन ती रक्कम कोणाकडुन वसुल करायची याबाबत गटविकास अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा.

वरील आदेश पारीत करुन सदरचे अपिल निकाली काढण्यात येते.

**(भास्कर पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**अमरावती खंडपीठ, अमरावती**